N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** सातारा शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0375 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/05/2023 21:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 09/05/2023

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/05/2023

**Time From (वेळेपासून):** 14:14 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/05/2023 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 066

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/05/2023 21:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

ईशान्य, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सब रजिस्ट्रार सातारा - 1 कार्य, सातारा ,सातारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पंकज संपत पवार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लट नं 7, विजयनगर कलनी, ,जुनी एमआयडीसी गणेश चौक,कोडोली, , सातारा,सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लट नं 7, विजयनगर कलनी, ,जुनी एमआयडीसी गणेश चौक,कोडोली, , सातारा,सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9767717478

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उदय धनाजी सुर्यवंशी | | वडील का नाम : धनाजी | 1. सह दुय्यम निबंधक,सब रजिस्ट्रार सातारा - 1 कार्य, सातारा,सातारा,सातारा शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू. मध्ये**)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास**)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत **):**

खबरी जबाब दि - 10/05/2023

मी अॅडव्होकेट पंकज संपत पवार, वय - 40 वर्षे, रा - प्लॉट नं. 7, विजयनगर कॉलनी, जुनी एम.आय.डी.सी. गणेश चौक, कोडोली, ता.जि. सातारा. मो.नं - 9767717478.

मी दि. 09/05/2023 रोजी सकाळी 11.45 वा. चे सुमारास अँन्टी करप्शन ब्युरो सातारा येथ समक्ष हजर राहुन पोलीस उप अधीक्षक श्रीमती वैद्य मॅडम यांची भेट घेवुन माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली व मी टाइप करुन आणलेला तक्रारी अर्ज वैद्य मॅडम यांचेकडे दिला. त्यानुसार मी माझेकडे लाच मागणाऱ्या लोकसेवकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली.

त्यानुसार दि. 09/05/2023 रोजी माझ्या तक्रारीवरुन पो.उप.अधी. वैद्य मॅडम यांनी दोन सरकारी पंचांना बोलावुन घेतले व पंच अँटी करप्शन ब्युरो कार्यालयात हजर झाले तेव्हा वैद्य मॅडम यांनी पंचांची माझ्याशी व माझी पंचांशी ओळख करुन देवुन माझी तक्रार थोडक्यात सांगितली की, मी व्यवसायाने वकील असुन माझ्या अशिलांच्या कर्ज प्रकारांमध्ये मी बँकांना आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता करुन सदरची लोन प्रकरणे सब रजिस्टार ऑफिस सातारा यांचेकडे नोटीस ऑफ इन्टीमेशनच्या मंजुरीसाठी ऑनलाईन सबमिट करीत असतो. सध्या माझी एकुण 5 प्रकरणे सब रजिस्ट्रार सातारा.- 1 या कार्यालयाकडे प्रलंबित असुन ती मंजुर करण्यासाठी/ त्याच्यावर कार्यवाही करण्यासाठी म्हणुन श्री. सुर्यवंशी साहेब सब रजिस्टार सातारा - 1 हे माझ्याकडुन पैसे घेतल्याशिवाय या प्रलंबित प्रकरणांचा मंजुरी देणार नाहीत याची मला खात्री असल्याने श्री. सुर्यवंशी, सब रजिस्ट्रार सातारा - 1 हे यांचेवर कायदेशीर कारवाई करावी अशी तक्रार केली असुन तशी मी सविस्तर लेखी तक्रार नोंदविली असल्याचे सांगितले व माझी लेखी तक्रार पंचाना वाचायला देवुन त्यावर त्यांच्या सह्या घेतल्या.

त्यानंतर पो.उप.अधी. वैद्य मॅडम यांचे सुचनेवरुन पो.शि. भोसले यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व सीलबंद मेमरी कार्ड मला व दोन्ही पंचांना दाखवुन त्याबाबत संपुर्ण माहिती देवुन त्यांचेकडील सीलबंद मेमरी कार्ड काढुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये घातले. त्यानंतर पो.उप.अधी. वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डरसह मला व पंच नं. 1 यांना माझे खाजगी दुचाकी वाहन क्रमांक एम.एच.11.बी.एस.5191 वरुन सुर्यवंशी साहेब यांची भेट घेण्यासाठी पाठवले. ती वेळ 14.14 वाजताची होती. मी व पंच नं. 1 असे सब रजिस्ट्रार सातारा - 1 कार्यालयात गेलो तेव्हा सुर्यवंशी साहेब हे आम्हाल जिन्यातच भेटल्याने मी त्यांना नमस्कार केला व आम्ही कार्यालयात बाहेर व्हरांड्यामध्ये थांबुन राहिलो. थोड्यावेळाने त्या कार्यालयातील खाजगी इसम अजिंक्य याने मला साहेबांनी आत बोलावले आहे असा निरोप दिला. म्हणुन मी सुर्यवंशी साहेबांना भेटायला त्यांच्या केबिनमध्ये गेलो. तेव्हा सुर्यवंशी साहेबांनी माझ्याकडे माझ्या पाच प्रलंबित नोटीस ऑफ इन्टीमेशनच्या कामासाठी प्रत्येकी 300 रुपये याप्रमाणे एकुण 15,00/- रुपयाची मागणी केली. व सदरची लाचेची रक्कम खाजगी इसम अजिंक्य याच्या खात्यावर टाकण्यास सांगितले. त्याला मी होकार दिला व मी आणि पंच असे दोघेजण माझे दुचाकीवरुन अँटी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. त्यावेळी वैद्य मॅडम यांचे सुचनेवरुन पो.शि. भोसले यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. ती वेळी 14.49 वा. ची होती. त्यानंतर वैद्य मॅडम यांनी मला व पंच नं. 1 यांना झालेली हकीकत विचारुन तसेच रेकॉर्डर मधील संभाषण ऐकुन श्री. सुर्यवंशी सब रजिस्ट्रार सातारा - 1 यांनी माझ्याकडे 1500/- लाचेची मागणी करुन ती रक्कम खाजगी इसम अजिंक्य याचे खात्यामध्ये टाकण्यास सांगितल्याची पो.उप.अधी. वैद्य मॅडम यांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.

त्यानंतर पो.उप.अधी. वैद्य मॅडम यांनी माझ्या सोयीनुसार आज दि. 10/05/2023 रोजी सापळा कारवाईचे आयोजन करुन 1500/- रु. लाच रक्कम हजर करण्यास सांगितल्याने मी 1500/- रुपये इतकी लाचेची रक्कम पो.उप.अधी. वैद्य मॅडम यांचेकडे हजर केली. पो.उप.अधी वैद्य मॅडम यांनी त्यानंतर सापळा पुर्व व सापळा कारवाईची थोडक्यात माहिती मला व पंचांना सांगुन अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्रा व्हॉयलेट दिवा याची माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षिक कार्यालयामध्ये करुन दाखविले. अँटी करप्शन ब्युरो कार्यालयातील पो.कॉ. विक्रम कणसे यांनी

1500/- रु. लाचेच्या रकमेस अॅन्थ्रासिन पावडर लावली व ती लाचेची रक्कम माझ्या शर्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवुन दिली. सदरची सापळा पुर्व कारवाई अँटी करप्शन ऑफिस सातारा येथे पुर्ण करण्यात आली. पो.उप.अधी. वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकाला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यत त्या सर्व सुचना दिल्या आणि मला व पंच नं. 1 यांना लाचेची रक्कम घेवुन सुर्यवंशी साहेब यांना लाचेची रक्कम देण्यासाठी माझे दुचाकीवरुन रवाना केले. ती वेळ 10.43 वा. ची होती.

त्यानंतर मी व पंच नं. 1 हे माझ्या दुचाकीवरुन सब रजिस्ट्रार सातारा - 1 या कार्यालयामध्ये गेलो. मी सुर्यवंशी साहेबांच्या केबिनमध्ये गेलो. व पंच नं. 1 सुर्यवंशी साहेबांच्या केबिनचे बाहेर थांबुन राहिले. मी आत जावुन सुर्यवंशी साहेबांची भेट घेतली तेव्हा त्यांनी " झाले का " असे विचारले तेव्हा मी त्यांना पैसे दाखवुन " तुम्हाला हे नव्हते ना साहेब " असे सांगितले व मी पावडर लावलेल्या नोटा माझ्या उजव्या हाताने माझ्या शर्टच्या डाव्या खिशातुन काढुन सुर्यवंशी साहेबांसमोर धरल्या असता सुर्यवंशी साहेबांनी " 5 चे आहेत ना ? " असे विचारुन माझ्याकडुन पावडर लावलेल्या नोटा उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या मागील उजवे खिशात ठेवल्या. त्यानंतर मी बाहेर येवुन पंच नं. 1 व सापळा पथक यांना दिसेल अशा रितीने माझ्या डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन पुर्वनियोजित इशार केला तेव्हा लागलीच वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार पो.शि. भोसले यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढला व बंद केला. ती वेळ 11.15 वा. ची होती. त्यानंतर लागलीच सापळा पथक केबिनमध्ये गेले. व वैद्य मॅडम यांच्या सुचनेनुसार पो.ना. नलवडे यांनी सुर्यवंशी यांचा उजवा हात पकडला. व पंच नं. 2 यांनी श्री. सुर्यवंशी यांच्या पॅंटचे मागील उजव्या खिशातुन लाचेची रक्कम हस्तगत केली. त्यानंतर वैद्य मॅडम यांचे सुचनेवरुन श्री. सुर्यवंशी यांचे केबिनमध्ये कृत्रिम अंधार करुन अल्ट्रा व्हॉयलेट दिवाच्या प्रकाशामध्ये श्री. सुर्यवंशी यांचे दोन्ही हात तपासले असता श्री. सुर्यवंशी यांच्या उजव्या हाताच्या बोटाच्या पेरावर व पॅन्टच्या मागील खिशाच्या आतील बाजुस फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच माझ्या हातांची देखील अल्ट्रा व्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात पाहणी केली असता माझ्या उजव्या हाताच्या बोटांच्या पेरावर देखील फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर पो.उप.अधी. वैद्य मॅडम यांनी श्री. सुर्यवंशी सब रजिस्ट्रार सातार - 1 यांचे वरिष्ठ अधिकारी श्री. एम. बी. खामकर सह जिल्हा निबंधक वर्ग - 2 तथा प्रशासकीय अधिकारी सातारा यांना बोलावुन सापळा कारवाईची माहिती दिली. त्यानंतर सापळा पथक पंचनाम्याने पुढील कारवाई करणेकरिता अँटी करप्शन सातारा येथील कार्यालयामध्ये आले व याच ठिकाणी सापळा पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 09/05/2023 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री. उदय धनाजी सुर्यवंशी सह दुय्यम निबंधक सब रजिस्ट्रार सातारा - 1 कार्यालय सातारा यांनी माझे अशिलांच्या नोटीस ऑफ इन्टीमेशनच्या पाच प्रकरणांना मंजुरी देण्यासाठी प्रत्येकी 300रुपये प्रमाणे 1500/- रुपये लाचेच्या रकमेची मागणी करुन ती दि. 10/05/2023 रोजी सापळा कारवाई दरम्यान प्रत्यक्ष लाचेची रक्कम माझ्याकडुन स्विकारली आहे. म्हणुन माझी श्री. उदय धनाजी सुर्यवंशी सह दुय्यम निबंधक सब रजिस्ट्रार सातारा - 1 कार्यालय सातारा यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केला असुन तो मी वाचुन पाहिला बरोबर आहे.

समक्ष हा जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

BAGHWAN BABANRAO NIMBALKAR(I (Inspector)) / DGPBBNH6502 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BAGHWAN BABANR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPBBNH6502

पो. स्टे. ऑफिसर
सातारा शहर पो. स्टे

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**)**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**

**खबरी जबाब** **दिनांक १०/०५/२०२३**

मी, ॲडव्होकेट पंकज संपत पवार, रा. प्लॉट नं.७, विजयनगर कॉलनी, जुनी एम आय डी सी, गणेश चौक, कोडोली, ता. जि. सातारा. मो.नं.९७६७७१७४७८.

मी दि.०९/०५/२०२३ रोजी सकाळी ११.४५ वा चे सुमारास ॲन्टी करप्शन ब्युरो सातारा येथे समक्ष हजर राहून पोलीस उप अधीक्षक श्रीमती वैद्य मॅडम यांची भेट घेवून माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली व मी टाइप करून आणलेला तक्रारी अर्ज वैद्य मॅडम यांचेकडे दिला. त्यानुसार मी माझेकडे लाच मागणाऱ्या लोकसेवकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली.

त्यानुसार दि.०९/०५/२०२३ रोजी माझ्या तक्रारीवरुन पोउपअधी वैद्य मॅडम यांनी दोन सरकारी पंचांना बोलावून घेतले व पंच ॲन्टी करप्शन ब्यूरो कार्यालयात हजर झाले. तेव्हा वैद्य मॅडम यांनी पंचांची माझेशी व माझी पंचांशी ओळख करुन देवून पंचांना माझी तक्रार थोडक्यात सांगितली की, मी व्यवसायाने वकील असून माझ्या अशिलांच्या कर्ज प्रकरणांमध्ये मी बँकांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता करून सदरची लोन प्रकरणे सब रजिस्टार ऑफीस सातारा यांचेकडे नोटीस ऑफ इंटीमेशन च्या मंजुरीसाठी ऑनलाईन सबमिट करत असतो. सध्या माझी एकुण पाच प्रकरणे सब रजिस्ट्रार सातारा-१ या कार्यालयाकडे प्रलंबित असून ती मंजूर करण्यासाठी/त्याच्यावर कार्यवाही करण्यासाठी म्हणुन श्री सुर्यवंशी साहेब सब रजिस्ट्रार, सातारा-१ हे माझ्याकडून पैसे घेतल्याशिवाय या प्रलंबित प्रकरणांना मंजुरी देणार नाहीत याची मला खात्री असल्याने श्री सुर्यवंशी, सब रजिस्ट्रार सातारा-१ यांचेवर कायदेशीर कारवाई करावी अशी तक्रार केली असून तशी मी सविस्तर लेखी तक्रार नोंदविली असल्याचे सांगितले व माझी लेखी तक्रार पंचांना वाचायला देवून त्यावर त्यांच्या सह्या घेतल्या.

त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांचे सुचनेवरुन पोशि भोसले यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व सीलबंद मेमरी कार्ड मला व दोन्ही पंचांना दाखवून त्याबाबत संपूर्ण माहिती देवून त्यांचेकडील सीलबंद मेमरी कार्ड काढून व्हॉईस रेकॉर्डर मंध्ये घातले. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डरसह मला व पंच नं. १ यांना माझे खाजगी दुचाकी वाहन क्रमांक एम एच ११ बी एस ५१९१ वरून सूर्यवंशी साहेब यांची भेट घेण्यासाठी पाठवले ती वेळ १४.१४ वाजताची होती. मी व पंच नं १ असे सब रजिस्ट्रार सातारा-१ कार्यालयात गेलो तेव्हा सुर्यवंशी साहेब हे आम्हाला जीन्यातच भेटल्याने मी त्यांना नमस्कार केला व आम्ही कार्यालयात बाहेर व्हरांड्यामध्ये थांबून राहीलो. थोड्या वेळाने त्या कार्यालयातील खाजगी इसम अजिंक्य याने मला साहेबांनी आत बोलावले आहे असा निरोप दिला. म्हणुन मी सुर्यवंशी साहेबांना भेटायला त्यांच्या केबिन मध्ये गेलो. तेव्हा सुर्यवंशी साहेबांनी माझ्याकडे माझ्या पाच प्रलंबित नोटीस ऑफ इंटीमेशन च्या कामासाठी प्रत्येकी ३०० रुपये या प्रमाणे एकुण १५००/- रुपयांची मागणी केली. व सदरची लाचेची रक्कम खाजगी इसम अजिंक्य याच्या खात्यावर टाकण्यास सांगितली. त्याला मी होकार दिला व मी आणि पंच असे दोघेजण माझे दुचाकी वरून ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. त्यावेळी वैद्य मॅडम यांचे सूचनेवरुन पोशि भोसले यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला. ती वेळ १४.४९ वा.ची होती. त्यानंतर वैद्य मॅडम यांनी मला व पंच नं.१ यांना झालेली हकिकत विचारुन तसेच रेकॉर्डर मधील संभाषण ऐकून, श्री सुर्यवंशी, सब रजिस्ट्रार, सातारा-१ यांनी माझ्याकडे १५००/- रु. लाचेची मागणी करुन ती रक्कम खाजगी इसम अजिंक्य याचे खात्यामध्ये टाकण्यास सांगितल्याची पोउपअधी वैद्य मॅडम यांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.

पो. स्टे. ऑफिसर
सातारा शहर पो. स्टे.

त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी माझ्या सोईनुसार आज दि.१०/०५/२०२३ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करुन १५००/- रु. लाच रक्कम हजर करण्यास सांगितल्याने मी १५००/- रु इतकी लाचेची रक्कम पोउपअधी वैद्य मॅडम यांचेकडे हजर केली. पोउपअधी वैद्य मॅडम यांनी त्यानंतर सापळा पूर्व व सापळा कारवाईची थोडक्यात माहिती मला व पंचांना सांगून ॲन्थ्रासीन पावडर व अल्ट्रा व्हॉयलेट दिवा यांची माहिती देवून त्याचे प्रात्याक्षिक कार्यालयामध्ये करुन दाखविले. ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातील पो.कॉ. विक्रम कणसे यांनी १५००/- रु. लाचेच्या रक्कमेस ॲन्थ्रासीन पावडर लावली व ती लाचेची रक्कम माझ्या शर्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवून दिली. सदरची सापळापूर्व कारवाई ॲन्टी करप्शन ऑफिस सातारा येथे पूर्ण करण्यात आली. पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकाला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या आणि मला

व पंच नं. १ यांना लाचेची रक्कम घेवून सुर्यवंशी साहेब यांना लाचेची रक्कम देण्यासाठी माझे दुचाकीवरुन रवाना केले ती वेळ १०.४३ वा.ची होती.

त्यानंतर मी व पंच नं. १ असे माझ्या दुचाकीवरून सब रजिस्ट्रार सातारा-१ या कार्यालयामध्ये गेलो. मी सुर्यवंशी साहेबांच्या केबिनमध्ये गेलो व पंच १ सुर्यवंशी साहेबांच्या केबिन बाहेर थांबून राहीले. मी आत जाऊन सुर्यवंशी साहेबांची भेट घेतली तेव्हा त्यांनी 'झाले का' असे विचारले तेव्हा मी त्यांना पैसे दाखवून 'तुम्हाला हे दिले नव्हते ना साहेब' असे सांगितले व मी पावडर लावलेल्या नोटा माझ्या उजव्या हाताने माझ्या शर्टच्या डाव्या खिशातून काढून सुर्यवंशी साहेबांसमोर धरल्या असता सुर्यवंशी साहेबांनी '५ चे आहेत ना?' असे विचारून माझ्या कडून पावडर लावलेल्या नोटा उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या पँटच्या मागील उजव्या खिशामध्ये ठेवल्या. त्यानंतर मी बाहेर येऊन पंच नंबर १ व सापळा पथक यांना दिसेल अशा रितीने माझा डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवून पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा लागलीच वैद्य मॅडम यांच्या सुचनेनुसार पोशि भोसले यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढला व बंद केला. ती वेळ ११.१५ वा ची होती. त्यानंतर लागलीच सापळा पथक केबिन मध्ये गेले व वैद्य मॅडम यांचे सूचनेनुसार पोना नलावडे यांनी सुर्यवंशी साहेब यांचा उजवा हात पकडला व पंच नं २ यांनी श्री सुर्यवंशी यांच्या पँटचे मागील उजव्या खिशातून लाचेची रक्कम हस्तगत केली. त्यानंतर वैद्य मॅडम यांच्या सूचनेवरून श्री सुर्यवंशी यांचे केबिनमध्ये कृत्रीम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये श्री सुर्यवंशी यांचे दोन्ही हात तपासले असता श्री सुर्यवंशी यांच्या उजव्या हाताच्या बोटाच्या पेरांवर व पँटच्या मागील उजव्या खिशाच्या आतील बाजूस फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच माझ्या हातांची देखील अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटाच्या पेरांवर देखील फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी श्री सुर्यवंशी, सब रजिस्ट्रार सातारा-१ यांचे वरीष्ठ अधिकारी श्री.एम.बी.खामकर, सह जिल्हा निबंधक वर्ग-२, तथा प्रशासकीय अधिकारी, सातारा यांना बोलावून सापळा कारवाईची माहिती दिली त्यानंतर सापळा पथक पंचनाम्याचे पुढील कारवाई करण्याकरीता अॅन्टी करप्शन ब्युरो सातारा येथील कार्यालयामध्ये आले व याच ठिकाणी सापळा पंचनाम्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. ०९/०५/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक श्री उदय धनाजी सुर्यवंशी, सह दुय्यम निबंधक, सब रजिस्ट्रार, सातारा-१ कार्यालय, सातारा यांनी माझे अशिलांच्या नोटीस ऑफ इंटीमेशनच्या पाच प्रकरणांना मंजुरी देण्यासाठी प्रत्येकी ३०० रुपये प्रमाणे १५००/- रुपये लाचेच्या रकमेची मागणी करून ती दि.१०/०५/२०२३ रोजी सापळा कारवाई दरम्यान प्रत्यक्ष लाचेची रक्कम माझ्याकडून स्विकारली आहे. म्हणून माझी श्री.उदय धनाजी सुर्यवंशी, सह दुय्यम निबंधक, सब रजिस्ट्रार, सातारा-१ कार्यालय, सातारा यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

समक्ष

एन. एस. सुर्यवंशी
म.पो.स्वा.ब.नं. ७९९

पो. स्टे. ऑफिसर
सातारा शहर पो. स्टे.

हे लिहून दिले